जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
Monday, Date 13 July 2026
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

भीम पार्कच्या रणांगणात अर्जुनास्त्रावर त्रिशुळवार

‘अभ्यास कर बाळा, मग बोल’

मंजुरी, एनओसी आणि निधीच्या दाव्यांवर गोरंट्यालांचा कागदपत्रांसह प्रतिआघात

जालना । प्रतिनिधी - जालना शहरातील प्रस्तावित भीम पार्क व विपश्यना केंद्र उभारणीच्या मुद्द्यावरून राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. इंदेवाडी येथील कार्यक्रमात शिवसेनेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी भीम पार्कच्या विषयावर माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर टीका केल्यानंतर गोरंट्याल यांनी पत्रकार परिषद घेऊन त्यास सविस्तर उत्तर दिले. यावेळी त्यांनी पत्रकारांसमोर आमदार खोतकर यांच्या भाषणाची व्हिडिओ क्लिपही ऐकवली आणि त्यांच्या वक्तव्यांवर मुद्देसूद प्रतिवाद केला.

पत्रकार परिषदेत बोलताना गोरंट्याल यांनी जिल्हाधिकारी जालना यांनी महानगरपालिका आयुक्तांना दिलेल्या अधिकृत निर्देशांचे पत्र पत्रकारांसमोर सादर केले. या पत्रानुसार, सामाजिक न्याय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ५ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीनंतर प्रकल्पासंदर्भात काही पूर्वअटी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

त्यांनी सांगितले की, ज्या जागेवर भीम पार्क उभारण्याचा प्रस्ताव आहे ती जमीन सध्या महाराष्ट्र शासनाच्या मालकीची आहे. ती प्रथम जालना महानगरपालिकेच्या नावावर वर्ग करणे आवश्यक आहे. त्यानंतरच पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊ शकते. याशिवाय संबंधित ठिकाणी तलाव असल्यामुळे तांत्रिक व्यवहार्यता ( ), पर्यावरण विभागाची ना हरकत ( ), तसेच अन्य आवश्यक परवानग्या घेणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गोरंट्याल यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रातील मुद्द्यांचा उल्लेख करत सांगितले की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम (एमआरटीपी) १९६६ च्या कलम ३७ नुसार विकास आराखड्यात आवश्यक बदल करणे, जमिनीचे आरक्षण बदलणे, तसेच प्रकल्पाचे ३ वॉक-थ्रू सादरीकरण तयार करणे अशा अनेक प्रक्रिया अद्याप पूर्ण व्हायच्या आहेत. या सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच शासनाकडून अंतिम मंजुरीची प्रक्रिया पुढे जाऊ शकते, असा त्यांचा दावा होता.

आमदार खोतकर यांनी प्रकल्पासाठी निधी मंजूर झाल्याचा केलेला दावा फ टाळताना गोरंट्याल म्हणाले, ‘‘मंजुरी मिळाली असे सांगितले जाते, मात्र अंतिम प्रशासकीय मंजुरी नेमकी केव्हा झाली, याची माहितीच आमदारांना नाही. अशा प्रकारचे आमदार जालन्याला लाभणे हे दुर्दैव आहे.‘‘

भीम पार्क हा केवळ औपचारिक प्रकल्प नसून तो राज्यातील एक आकर्षक आणि दर्जेदार स्मारक व्हावा, अशी भूमिका मांडत त्यांनी, ‘‘भीम पार्कचे विसर्जन कुंड करायचे नाही,‘‘ अशी टीकात्मक टिप्पणी केली.

यावेळी त्यांनी महानगरपालिकेतील विसर्जन कुंड वर गंभीर आरोप केले. ‘‘दोन कोटी रुपयांचे काम दाखवून १९ कोटी रुपयांची उचल करण्यात आली,‘‘ असा आरोप त्यांनी केला. तसेच पूर्वी शहरातील भूमिगत गटार (अंडरग्राउंड ड्रेनेज) योजनेवर मोठ्या प्रमाणात सत्कार स्वीकारण्यात आले, मात्र त्या कामाचे पुढे काय झाले, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

गोरंट्याल यांनी विधानसभेतील आमदारांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत, क्रिप्टो करन्सी प्रकरण, जालना मर्चंट बँकेच्या प्रश्नावर किंवा इतर महत्त्वाच्या विषयांवर आमदार खोतकर यांनी विधानसभेत प्रभावीपणे आवाज का उठविला नाही, असा प्रश्न विचारला.

जालना मर्चंट बँकेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, बँकेच्या सभासदांना पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण असल्यामुळे काही रक्कम मिळाली आहे. मात्र उर्वरित ठेवीदारांचे पैसे मिळवून देण्यासाठी आमदारांनी पुढाकार घ्यावा, असे आव्हान त्यांनी दिले.

भीम पार्कच्या उभारणीस आपण विरोध करत नसल्याचे स्पष्ट करत गोरंट्याल म्हणाले की, पर्यावरणाची आवश्यक ना हरकत मिळविण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, भास्कर दानवे तसेच भीमसैनिकांच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्री यांची भेट घेण्यास आपण तयार आहोत. सर्व आवश्यक परवानग्या मिळवून महाराष्ट्रभरातील नागरिक पाहण्यासाठी येतील, असे भव्य भीम पार्क उभारण्याचा आपला प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत शेवटी आमदार खोतकर यांच्यावर पुन्हा टीका करत गोरंट्याल म्हणाले, ‘‘कोणत्या प्रकल्पासाठी कोणत्या प्रकारच्या एनओसी आणि कायदेशीर प्रक्रिया आवश्यक असतात, याचा आधी अभ्यास करा. अभ्यास कर बाळा, मग बोल,‘‘ असा टोला त्यांनी लगावला.

दरम्यान, भीम पार्क व विपश्यना केंद्राच्या प्रस्तावावरून सुरू झालेला हा राजकीय वाद आता अधिकच चिघळण्याची चिन्हे असून, आगामी काळात या विषयावर राजकीय आरोप-प्रत्यारोप आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भीम पार्क-विपश्यना केंद्राला कैलास गोरंट्याल यांचा विरोध

आमदार अर्जुनराव खोतकर यांची टीका

जालना । प्रतिनिधी - जालना शहरातील प्रस्तावित भीम पार्क आणि विपश्यना केंद्र उभारणीच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, शिवसेनेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर तीव्र टीका करत त्यांच्या भूमिकेचा जाहीर निषेध व्यक्त केला. इंदेवाडी परिसरातील विविध विकासकामांच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी बोलताना आमदार खोतकर यांनी सांगितले की, जालना शहराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या भीम पार्क आणि विपश्यना केंद्रासाठी राज्य शासनाकडून तब्बल १३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेण्यात आला आहे. हा प्रकल्प शहराच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटन विकासाला चालना देणारा ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला.

या प्रकल्पाला विरोध करणारे नेमके कोण, असा सवाल उपस्थित करत खोतकर म्हणाले की, शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतरही काहीजण राजकीय हेतूने या विकासकामाला विरोध करत आहेत. त्यांनी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर या प्रकल्पाला विरोध केल्याचा आरोप केला.

खोतकर यांनी पुढे सांगितले की, पालकमंत्री पंकजा मुंडे, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल तसेच महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांनीही भीम पार्कचा प्रस्ताव पुढे नेण्यास सकारात्मक भूमिका घेतली होती. अशा परिस्थितीत विकासाच्या कामांमध्ये अडथळे निर्माण करणे शहराच्या हिताचे नसल्याचे त्यांनी म्हटले.

‘‘अनेक वर्षे आमदार म्हणून प्रतिनिधित्व करताना या विषयावर कोणतीही ठोस भूमिका घेण्यात आली नाही. मात्र आता विकासकामांना विरोध केला जात आहे. काही लोक केवळ अर्जुन खोतकरांना विरोध करण्यासाठीच प्रत्येक विकासकामाला विरोध करत आहेत,‘‘ असा आरोपही त्यांनी केला.

यावेळी त्यांनी जालना मर्चंट बँकेच्या माध्यमातून नागरिकांना ९३ कोटी रुपयांचा आर्थिक लाभ मिळवून दिल्याचा दावा केला. तसेच भीम पार्कचा विषय आपण स्वतः विधानसभेत उपस्थित करून संबंधित मंत्र्यांशी चर्चा केली असून, प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

‘‘आमचा उद्देश राजकारण करणे नसून जालना शहराचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधा, रोजगारनिर्मिती आणि शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेले प्रत्येक प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,‘‘ असेही खोतकर यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, भीम पार्क आणि विपश्यना केंद्राच्या प्रस्तावावरून शहरात राजकीय चर्चा रंगल्या असून, या प्रकल्पाबाबत विविध स्तरांवर मतमतांतरे व्यक्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केलेल्या वक्तव्यामुळे हा विषय पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

प्रभाग क्रमांक ८ मध्ये एसआयआर जनजागृती व फॉर्म भरणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

‘प्रत्येक मतदाराने एसआयआर प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक’

नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले व पूजा दिनेश भगत यांच्या पुढाकाराने नागरिकांना मार्गदर्शन

जालना । प्रतिनिधी - प्रभाग क्रमांक ८ मध्ये विशेष सघन मतदार यादी पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेला गती देण्यासाठी शिवसेनेचे नगरसेवक तथा प्रभागप्रमुख दुर्गेश काठोठीवाले आणि नगरसेविका पूजा दिनेश भगत यांच्या पुढाकाराने व्यापक जनजागृती आणि फॉर्म भरणी अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात नागरिकांना एसआयआर प्रक्रियेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तसेच अनेक मतदारांचे अर्ज प्रत्यक्ष भरून घेण्यात आले.

यावेळी नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले स्वतः उपस्थित राहून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करत होते. मतदानाचा घटनात्मक अधिकार अबाधित राहण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराने तसेच आपल्या संपूर्ण कुटुंबातील सदस्यांनी एसआयआर प्रक्रिया गांभीर्याने पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही, यासाठी वेळेत आवश्यक कागदपत्रांसह फॉर्म भरावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

या अभियानात पर्यवेक्षक प्रशांत कुलथे, तुकाराम कोल्हे, तसेच बीएलओ गजानन पत्ते, रघुनंदन कंगले, राहुल बोरा, समरीन मॅडम, शशिकांत सोनवणे, गिरे सर आणि हितेंद्र आगळे यांनी नागरिकांना आवश्यक माहिती देऊन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुलभ केली.

याशिवाय शिवसेनेचे पदाधिकारी दिनेश भगत, योगेश खताडे, लक्ष्मण वर्मा, विक्रम काठोठीवाले, अभिमन्यू काठोठीवाले आणि धीरज काठोठीवाले यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत नागरिकांशी संपर्क साधत एसआयआर मोहिमेला यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

या अभियानाला प्रभागातील मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक नागरिकांनी जागेवरच फॉर्म भरून प्रक्रिया पूर्ण केली. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त प्रयत्नामुळे मतदार नोंदणी व पडताळणी प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविली जात असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, प्रभाग क्रमांक ८ मध्ये विकासकामांबरोबरच नागरिकाभिमुख उपक्रम सातत्याने राबविल्यामुळे नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांच्या कार्याचे नागरिकांकडून कौतुक होत असून, त्यांच्या कामकाजाला प्रभागातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.